**प्रसिध्दी पत्रक** दिनांक ०७/०२/२०२४

आरोपी लोकसेवक १) श्री. सुरजसिंग त्रिंबकसिंग राजपुत, वय ४० वर्षे, पद-तलाठी, (वर्ग-३), रा. विना सोसासयटी, जटवाडा रोड छत्रपती संभाजीनगर खाजगी ईसम २) संभाजीराव नंदु शिंदे, वय ३० वर्षे, व्यवसाय-शेती, रा. बिडकीन ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांच्याकडून तडजोडीअंती 8000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळयात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे बिडकीन, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | १) श्री. सुरजसिंग त्रिंबकसिंग राजपुत, वय ४० वर्षे, पद-तलाठी, (वर्ग-३), रा. विना सोसासयटी, जटवाडा रोड छत्रपती संभाजीनगर<br>२) संभाजीराव नंदु शिंदे, वय ३० वर्षे, व्यवसाय-शेती, रा. बिडकीन ता. पैठण जि. छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागणी रक्कम | :- | 10000/-रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | | तडजोडी अंती 8000/- रुपये |
| सापळा अधिकारी | :- | श्री. राहुल फुला, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे खाम नदीवर वाळू व पाणी भरण्याच्या ट्रॅक्टर आढळून आल्याने त्यावर कायदेशीर कारवाई न करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | | यातील तक्रारदार यांचे खाम नदीवर वाळू व पाणी भरण्याच्या ट्रॅक्टर आढळून आल्याने कायदेशीर कारवाई न करण्यासाठी यातील आरोपी लोकसेवक क्रमांक 1) श्री सुरजसिंग राजपुत यांनी खाजगी ईसम संभाजीराव शिंदे यांचे मदतीने तक्रारदार यांच्याकडे 10000/-रुपये दरमहा हप्ता बक्षीस म्हणून लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन दि. 07/02/2024 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से. क्र. 1 श्री. सुरजसिंग राजपुत यांनी खाजगी ईसम संभाजीराव शिंदे यांचे मार्फत तक्रारदार यांना तडजोडीअंती रुपये 8000/- लाचेची मागणी करुन लोकसेवक श्री. सुरजसिंग राजपुत यांचे सोबत बोलणे करुन दिल्याने लोकसेवकाने त्या गोष्टीस प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर तर्फे आजच दि. 07/02/2024 रोजी सापळा आयोजीत केला असता, खाजगी ईसम श्री. संभाजीराव शिंदे यांनी तक्रारदार यांचेकडून पंच साक्षीदारासमक्ष 8000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारली आहे. लाचेच्या रकमेसह खाजगी ईसम श्री. संभाजीराव शिंदे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. दोनही आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन बिडकीन छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे तक्रारदार यांचे फिर्यादी वरुन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मुकूंद आघाव, पोलीस उप अधीक्षक राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक- श्री राहुल फुला यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पोलीस हवालदार राजेंद्र सिनकर चालक पो.अं.सी.एन. बागुल यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777

पोलीस उप अधीक्षक कार्यालय लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर

**( राजीव तळेकर )**
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.